**नमुना नं.८ बाबतची माहिती अद्ययावत करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**ग्राम विकास विभाग**
शासन परिपत्रक क्रमांक: स्वामित्व २०२०/प्र.क्र. ८८/पं.रा.-४
बांधकाम भवन, २५ मर्झबान पथ
मुंबई ४०० ००१.
तारीख: ०४ फेब्रुवारी, २०२१

## परिपत्रक

गाव आणि शहरातील मालमत्तांचे प्रॉपर्टी कार्ड बाबतचे अभिलेख जिल्हा स्तरावर, जिल्हा अधिक्षक, भुमी अभिलेख यांच्या अभिरक्षेत असतात. तालुका स्तरावर याबाबतचे अभिलेख, उप अधिक्षक भुमी अभिलेख कार्यालयाच्या अभिरक्षेत असतात. कायद्याच्या दृष्टीकोनातून प्रॉपर्टी कार्ड हा गाव व शहरामधील. गावठाणामधील घराबाबतच्या आणि मोकळया जागांच्या मालकी हक्काबाबतचा अधिकार अभिलेख असतो.

२. महाराष्ट्र शासनाच्या महत्वाकांक्षी "स्वामित्व" योजनेअंतर्गत महाराष्ट्रातील सर्व गावांच्या गावठाणाचा ड्रोनव्दारे मोजमाप सर्वे सुरु करण्यात आला आहे. यामध्ये ग्राम विकास विभाग, जमाबंदी विभाग, महाराष्ट्र शासन आणि सर्वे ऑफ इंडिया, केंद्र शासन यांच्या संयुक्त सहभागाने गावठाणाचा सर्वे करुन सर्व मिळकतधारकांना त्यांचे कायदेशीर सनद (प्रॉपर्टी कार्ड) उपलब्ध करुन देण्यात येणार आहेत.

३. उपरोक्त कार्यवाहीसाठी ग्रामपंचायतींनी त्यांचेकडील आकारणी यादी (नमुना नं.८) इ-ग्राम सॉफ्ट या संगणक प्रणालीवर अचूक अपलोड करुन तो डाटा तालुका भूमी अभिलेख कार्यालयाकडे देण्यात येणार आहे. ग्रामपंचायतींनी संगणक प्रणालीवर अपलोड केलेला नमुना नं.८ चा डाटा योग्य व अचूक असल्याबाबतची खात्री तालुका स्तरावर गट विकास अधिकारी यांनी करावी. इ-ग्राम सॉफ्ट या संगणक प्रणालीवरील नमुना नं.८ चा डाटा प्रोसेसींग करुन एन.आय.सी. मार्फत भुमी अभिलेख विभागाकडे पुढील कार्यवाहीसाठी पाठविला जात आहे. त्यामुळे यापूर्वीच्या ग्राम विकास विभागाकडील परिपत्रकातील सूचनांप्रमाणे नमुना नं.८ मधील मिळकत क्रमांक,

मालकाचे नाव/ नावे, मिळकतीचे लांबी X रुंदीसह क्षेत्रफळ इ. माहिती अचूक असल्याची खात्री करावी. सर्व मिळकतधारकांचे विशेषत: गावाबाहेर राहणा-या गावातील मिळकत धारकांचे मोबाईल क्रमांक, ई-मेल आयडी आणि राहण्याचा पत्ता इ. ग्राम सॉफ्ट या संगणक प्रणालीवर भरावेत आणि त्याची हार्ड कॉपी व सॉफ्ट कॉपी तालुका भुमी अभिलेख यांनाही सादर करावी. सदरची मोहीम १५ दिवसांत राबवून इ-ग्राम सॉफ्ट या संगणक प्रणालीवरील डाटा अद्यावत करण्यात यावा.

४. विशेषत: ज्या जिल्हयामध्ये ड्रोनव्दारे सर्वेक्षण सुरु करण्यात आले आहे, त्या जिल्हयांतील मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी याबाबत संबंधितांमार्फत कार्यवाही तात्काळ पूर्ण करुन घ्यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

**सुहास जाधवर**
**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

प्रत,

१. जमाबंदी आयुक्त तथा संचालक, भूमी अभिलेख विभाग, पुणे,
२. सर्व विभागीय आयुक्त,
३. सर्व जिल्हाधिकारी,
४. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
५. सर्व उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) जिल्हा परिषद,
६. निवडनस्ती (कार्यासन पंचायत राज-४)

महाराष्ट्र शासन
महसुल व वन विभाग
जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख (म.राज्य),पुणे
दुसरा व तिसरा मजला,नविन प्रशासकीय इमारत,विधान भवन समोर, कॅम्प,पुणे - १
दूरध्वनी क्र. ०२०-२६०५०००६ Email ID :dlrmah.mah@nic.in Web site :https://mahabhumi.gov.in

क्र./गावठाण/स्वामित्व /अचूक अभिलेख/का.वि.१४०१/२०२१ पुणे दिनांक: - २९/०७/२०२१

**विषय :-**"स्वामित्व" गावठाण भूमापन योजनेअंतर्गत भारतीय सर्वेक्षण विभागाकडून प्राप्त अंतिम नकाशातील क्षेत्र चौकशी नोंदवहीचे रकाना ७C यांत नमूद करणेबाबत.

**परिपत्रक:-**

"स्वामित्व" गावठाण भूमापन योजनेअंतर्गत राज्यातील ३९,७३३गावांचे गावठाण भूमापन काम करणेचे आहे.

आमचे असे निदर्शनास आले आहे की, भारतीय सर्वेक्षण विभाग यांचेकडून प्राप्त झालेल्या गावठाण भूमापन नकाशात नमूद असलेल्या क्षेत्राप्रमाणे,चौकशी नोंदवहीचे रकाना ७C (७क) यांत क्षेत्र नंमूद केले जाते.भारतीय सर्वेक्षण विभाग यांचेकडून अंतीम नकाशावर स्थलांतर दुरुस्ती (Topograpjical corrections) करतात.त्यामुळे क्षेत्रामध्ये बदल होतो.पर्यायाने क्षेत्रामध्ये तफावत येण्याची शक्यता नाकारता येत नाही.या बाबींचा विचार करुन खालील प्रमाणे कार्यपध्दती वापरणेचे सूचना देण्यात येत आहे.

१." भारतीय सर्वेक्षण विभाग यांचेकडून नकाशावर स्थलांतर दुरुस्ती (Topographical Corrections) केल्यानंतरच गावठाण भूमापनाचा अंतीम नकाशा तयार झाल्याचे निर्णयात घोषीत करावे व सदर अंतीम नकाशानुसार मिळकतीचे क्षेत्र चौकशी नोंदवहीचे रकाना ७C (७क) यांत नमूद करणेचे आहे.चौकशी नोंदवहीच्या रकाना ७C (७क) मधील क्षेत्रांच्या नोंदी नकाशा व नगर भूमापन क्रमांकनिहाय अचूक झालेल्या आहे किंवा नाही याची खात्री वरिष्ठ पातळीवर करण्यांत यावी.

२.गावठाण भूमापन योजनेमध्ये ज्या गावांचे चौकशी व अनुसरण काम पूर्ण झाले आहे,त्या गावांमध्ये भारतीय सर्व्हेक्षण विभाग यांनी अंतीम केलेल्या नकाशानुसार मिळकतपत्रिका,सनदा व चौकशी नोंदवहीमध्ये क्षेत्र नमुद आहे किंवा नाही याची खात्री करुनच नियमानुसार गांवे परिरक्षणास घ्यावी.

स्थळ प्रतीवर मा. जमाबंदी आयुक्त, पुणे
यांची स्वाक्षरी असे.

(अ.न. बैरागी)
कार्यालय अधिक्षक,गांवठाण
जमाबंदी आयुक्त कार्यालय, पुणे

प्रत:- उपसंचालक भूमि अभिलेख, औरंगाबाद, अमरावती, पूणे, नाशिक, नागपूर, कोकण यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.

प्रत :- जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख, सातारा,पूणे,सांगली, सोलापूर,कोल्हापूर, ठाणे, पालघर, रायगड,रत्नागिरी, सिंधुदूर्ग,नाशिक,अहमदनगर,नंदुरबार,जळगांव,धुळे, औरंगाबाद, परभणी,हिंगोली, नांदेड, बीड, उस्मानाबाद, लातूर, जालना, अमरावती, अकोला, बुलढाणा, यवतमाळ वाशिम, भंडारा,चंद्रपूर,गडचिरोली, नागपूर,गोंदिया, वर्धा यांना माहिती व आवश्यक त्या पुढील कार्यवाहीसाठी रवाना.